अनुदानित

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग प्राथमिक
जा.क.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/1833/२०१8
पुणे १
दिनांक : 28/8/2018

प्रति
**अध्यक्ष सचिव मुख्याध्यापक**
**नामदेवराव मोहोळ विद्या व किडा प्रतिष्ठान पुणे संचलित**
**माध्य.व उच्च.माध्यमिक विद्यालय वारजे पुणे ५८**

**विषय : बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ याचा नियम ११ पोट नियम ४ अन्व्यये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपला दिनांक १३.५.२०१३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार शाळेची तपासणी याआधारे

मी **शिक्षणाधिकारी प्राथमिक पुणे जिल्हा परिषद पुणे** दिनांक **०१.४.२०१३ पासून दिनांक ३१.०३.२०१६** पर्यत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता ८वी च्या** वर्गाकरिता **नामदेवराव मोहोळ विद्या व किडा प्रतिष्ठान पुणे संचलित माध्य.व उच्च.माध्यमिक विद्यालय वारजे पुणे ५८** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. **वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या आधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही.आणि इयत्ता ८वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२.बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम २००९ जोडपत्र एक आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाच्या हक्क नियम २०११ जोडपत्र दोन शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मयादेपर्यत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल.अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.

५. संस्था शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा त्याच्या मात्या पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या आभावी धर्म जात किंवा वंश जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही.किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकण्यास येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा प्रमाणपत्र देण्यात येईल.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच) विकलांग विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्याचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा)अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये . याची सुनिश्चिती शाळा करेल .

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील .

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थांना प्रवेश देईल .

१०. शाळा अधिनियमच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या .

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ : १0000 चौ . मी .
- एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ : ८५00 चौ . मी .
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ : १५00 चौ . मी .
- वर्ग खोल्यांची संख्या : १२
- कार्यालय नि भांडार नि मुख्याध्यापकाची खोली : 0९
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ?

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास | २ | २ |
| मुता-या | ८ | ४ |

- पिण्याच्या पाण्याच्या सुविधा : पाण्याची टाकी
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाक घर खोली : केंद्रीय पध्दतीने शा . पो . आ . देण्यात येतो .
- अध्यापन अध्ययन साहित्य खेळ व किडाविषयक सामग्री ग्रंथालय यांची उपलब्धता : आहे .
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध : आहे पुस्तकांची संख्या २४६१ वर्तमानपत्र : नियतकालिके संख्या : 0२

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविल्या जात नाहीत .

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या, कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येईल

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६0 (१८६0 चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विवस्त व्यवस्था अधिनियम १९५0 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे .

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही .

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्याव्येत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत . प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-याकडे पाठवण्यात यावी .

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक माध्य / अनु . / म . /एस . एस . सी . / एम . यु . एल/ ८०२/२०१३ १४ असा आहे . तसेच आपल्या शाळेचा U-DISE NO -27251401406 हा आहे . या कार्यालयाकडे कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा याची नोंद घ्यावी .

१७. मा . शिक्षण संचालक जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शतीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दुर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे .

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी .

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शती यासोबत जोडल्या आहेत .

प्रत मिळाली

२६/८/१४

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे .